जा. क्र / 5320/26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समोर
४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 17/9/26

प्रति,

मा.धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

**विषय** :- बाह्ययंत्रणेद्वारे पहारेकरी या पदाच्या निविदा सुचना
संकेतस्थळावर प्रसिदध करणेबाबत.

**संदर्भ** :- दि.१६/०९/२०२६ रोजीची निविदा सुचना.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, धर्मादाय आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे या कार्यालयाची बाह्ययंत्रणेद्वारे पहारेकरी या पदाची निविदा सुचना संकेतस्थळ प्रसिदध करणेसाठी सविनय सादर

आपला विश्वासू,

(दिनेश ए.कोठलीकर)
धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग,पुणे

सोबत :-

२) पहारेकरी निविदा सुचना

जा. क्र / 53 [9/26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग पुणे वाडीया कॉलेज समो.
४५-२, कै. बाळकृष्ण सखाराम ढोले
पाटील मार्ग, पुणे - १
दि. - 17/9/26

# निविदा सुचना

या द्वारे, सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, धर्मादाय सह आयुक्त पुणे ,विभाग पुणे या कार्यालयात **पहारेकरी**- पदासाठी निवीदा प्रक्रीया पार पाडणेकामी बाह्ययंत्रणेद्वारे निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. खालील अटी व शर्ती नुसार त्या मान्य असल्यास निविदा दि.२८/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत सादर कराव्या.त्यानंतर प्राप्त होण्या-या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## पहारेकरी कामाचे स्वरुप आणि अटी व शर्ती

१. धर्मादाय सह आयुक्त, पुणे हे कार्यालय 45-2, वाडिया कॉलेज जवळ,कै.बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग,पुणे या कार्यालय इमारतीच्या संरक्षणाचे कामकाज.

२. धर्मादाय सह आयुक्त, पुणे हे कार्यालय 45-2, वाडिया कॉलेज जवळ,कै.बाळकृष्ण सखाराम ढोले पाटील मार्ग,पुणे या कार्यालयातील जागेबाबत सर्व सुरक्षा प्रदान करणे.

३. कार्यालयातील कामकाजाचे दिवशी व वेळेमध्ये कार्यालयात येणा-या अभ्यागतांची नोंद अभ्यागत नोंदवहीत घेणे.

४. उपरोक्त दोन्ही ठिकाणी कार्यालयीन वेळेत , कार्यालयीन वेळेनंतर, सुट्टीच्या दिवशी कार्यालयाची सुरक्षा ठेवणे.

५. पहारेकरी यांची सेवा २४ तास आवश्यक आहे. सदर कामाकरीता तीन सुरक्षारक्षक नेमले जातील. एक पहारेकरी यांची सेवा आठ तास सलग ठेवण्यात येईल.

६. वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाज करणे.

७. सदरील कर्मचा-यांना अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचा-यांकडून कार्यालयास/इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८. नियुक्त केलेला कर्मचारी हा नेहमी स्वच्छ ,निरोगी व विहित केलेल्या गणवेषात व छातीवर ओळखपत्र लावलेले असले पाहिजे यांची दक्षता कंत्राटदारास घ्यावी लागेल. नियुक्त कर्मचा-यांची यादी आणि त्यांचा पूर्व इतिहास याबाबतची सर्व माहिती कार्यालयास पुरवावी लागेल्नियुक्त कर्मचा-यास कोणतेही संसर्गजन्य रोग होणार नाहीत याची दक्षता संबंधीत कंत्राटदाराने घ्यावी, तसेच वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र नियुक्ती वेळीस या कार्यालयाकडे सादर करावे.

९. कंत्राटी पहारेक-याचे नैसर्गीक आपत्ती ,अपघात,इजा/जखम इतर अनुचित घटना इत्यांदी कारणास्तव कोणतेही नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता (नुकसान भरपाई ) करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. धर्मादाय आयुक्त कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही तसेच कंत्राटी कर्मचारी यांचेकडून कार्यालयास/इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०.करार कालावधीत कंत्राटी पहारेकरी त्यांचे कोणतेही अधिकार /कर्तव्य व जबाबदा-या कोणत्याही तृतीय पक्षास हस्तांतरीत वा प्रत्यायोजीत करणार नाही.

११.करार कालावधीत उमेद्वाराची सचोटी संशयास्पद आढळून आल्यास अथवा कामकाजामध्ये निष्काळजीपणा दाखविल्यास अथवा करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर करारनामा संपुष्टात येईल व कंत्राटी कर्मचा-यास कोणतीही पुर्व सुचना न देता काढून टाकण्यात येईल.

१२.कंत्राटदाराने नियुक्त कामगारांना सामाजीक सुरक्षे अंतर्गत फ़ायदे तसेच पीएफ़ आणि एमपी ऍक्ट १९५२ अंतर्गत असलेले फ़ायदे देणे बंधनकारक राहील.

१३.कंत्राटी पहारेकरी वयमर्यादा कमीत कमीत १८ व जास्तीत जास्त ४५ राहील.

सदर पहारेकरी या पदाच्या निविदा प्रक्रीयेत स्वारस्य असणा-या पुरवठादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लिफ़ाफ़्यामध्ये सदर सुचना प्रसिध्द झाले नंतर दि.**२८.०९.२०२६** रोजी दुपारी **४.००** वाजेपर्यंत आस्थापना शाखा धर्मादाय सह आयुक्त,पुणे विभाग पुणे तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,पुणे विभाग पुणे येथे जमा कराव्यात. त्या निविदा दुपारी ५.०० वाजता उघडण्यात येईल.

**धर्मादाय सह आयुक्त**
**पुणे विभाग पुणे**